भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२१ ■ सोमवार २४ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४


॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

### सेवाशुल्क आकारणीनंतर मालमत्ता कराची वसुली नाही

## एम.आय.डी.सी. क्षेत्र उद्योगांना मालमत्ताकरात दिलासा

## दुहेरी कर आकारणी विरोधात उच्च न्यायालयाचा निर्णय

**मुंबई, दि. २३ : औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीतील भूखंडधारक व उद्योगांना मालमत्ता कराच्या मागणीपासून मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. एमआयडीसी स्वत: औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत असून त्यासाठी सेवा शुल्क वसूल करीत असेल, तर त्याच जमिनीवर स्थानिक स्वराज्य संस्थेकडून मालमत्ता कर आकारणी करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. बदलापूर औद्योगिक वसाहतीतील औद्योगिक भूखंडधारकांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी व न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.**

याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, एमआयडीसीकडून औद्योगिक युनिट्सना पायाभूत सुविधा व विविध सेवा पुरविल्या जात असून त्यासाठी सेवा शुल्कही आकारले जाते. असे असताना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून त्याच औद्योगिक भूखंडावर मालमत्ता कराची मागणी केली जात होती. न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या यापूर्वीच्या निर्णयाचा संदर्भ देत स्पष्ट केले की, एमआयडीसी कडून पायाभूत सुविधा व सेवा उपलब्ध करून देऊन त्याबदल्यात सेवा शुल्क आकारले जात असेल, तर एम आयडीसी व त्याच्या अखत्यारीतील भूखंडधारकांना मालमत्ता करातून संरक्षण मिळते. मात्र, संबंधित पायाभूत सुविधा व सेवांची जबाबदारी जर स्थानिक स्वराज्य संस्थेकडे अधिकृतपणे हस्तांतरित करण्यात आली आणि त्याबाबत योग्य व्यवस्था किंवा करार झाला, तर परिस्थिती वेगळी असू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या स्मॉल स्केल इंटरप्रेन्युअर्स असोसिएशन व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणातील निर्णयाचा आधार घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने मालमत्ता करातील संबंधित सवलत ही केवळ एमआयडीसी पुरती मर्यादित नसून, एमआयडीसीच्या (पान ४ वर)

### गणपती मुर्ती कोसळली दोन ठार, पाच जखमी

मुंबई, दि. २३- गणेशोत्सवाच्या आगमनाची तयारी सुरू असतानाच दक्षिण मुंबईतील भुलेश्वर परिसरात शनिवारी रात्री दुर्दैवी दुर्घटना घडली. भुलेश्वरचा राजा या मंडळाची सुमारे बावीस फूट उंच गणेशमूर्ती आगमन मिरवणुकी दरम्यान अचानक कोसळल्याने दोघांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. जखमींमध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे. बाळाराम मर्चंट रोडवरील कबुतरखाना, जय अंबे चौक परिसरात मंडपापासून अवघ्या पन्नास फूट अंतरावर ही घटना घडली. मुर्ती वाहून नेण्यासाठी वापरण्यात आलेली क्रेन कमजोर झाल्याने मुर्तीचा तोल जाऊन ती अचानक खाली कोसळल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत मंडळाचे अध्यक्ष संकेत नेवशे (वय ३३) आणि पदाधिकारी (पान ४ वर)

### धुळ्यात डेंग्युचे १४८, चिकुनगुनियाचे ५५ रूग्ण

## राज्यात साथीच्या आजाराने घातले थैमान

## मलेरियाचे बारा हजारापेक्षा अधिक रुग्ण

**मुंबई, दि. २३ : पावसाळ्यामुळे राज्यात कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढला असून, मलेरिया, डेंग्यू आणि चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येने आरोग्य विभागाची चिंता वाढवली आहे. एकवीस ऑगस्ट अखेर राज्यात मलेरियाचे बारा हजार २१९, डेंग्यूचे सहा हजार ३७९ आणि चिकुनगुनियाचे एक हजार ९३ रुग्ण आढळले आहेत. मलेरिया आणि डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मुंबई आघाडीवर आहे. डेंग्यूच्या रुग्णांत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे. धुळे शहरात डेंग्युचे १४८ तर चिकुनगुणियाचे ५५ रूग्ण आढळले आहेत.**



मलेरियाच्या रुग्णसंख्येत गतवर्षीच्या तुलनेत यंदा काहीशी घट झाली आहे. एकवीस ऑगस्ट २०२५ अखेर राज्यात मलेरियाचे तेरा हजार ६५८ रुग्ण आढळले होते. यंदा ही संख्या बारा हजार २१९ वर आली आहे. मात्र, मलेरियामुळे यंदा दोन जणांचा मृत्यू झाला असून, एकूण रुग्णांपैकी चार हजार ३९३ रुग्ण पी.एफ. प्रकारातील आहेत. दुसरीकडे, डेंग्यूची परिस्थिती चिंताजनक आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत चार हजार ३४४ रुग्णांची नोंद झाली होती. यंदा हा आकडा सहा हजार ३७९ वर पोहोचला आहे. डेंग्यूमुळे आतापर्यंत तीन मृत्यू झाले आहेत. चिकुनगुनियाचे एक हजार ९३ रुग्ण आढळले असून, या आजारामुळे अद्याप मृत्यू झालेला नाही. मलेरियात गडचिरोली आघाडीवर जिल्हानिहाय आकडेवारीनुसार गडचिरोलीत मलेरियाचे सर्वाधिक तीन हजार ४२६ रुग्ण आढळले आहेत. यापैकी दोन हजार ७५४ रुग्ण पी.एफ. प्रकारातील आहेत. गडचिरोलीत मलेरियामुळे दोन मृत्यू झाले आहेत. त्यानंतर रायगडमध्ये ३४१, गोंदियात १२६ आणि चंद्रपूरमध्ये ९२ रुग्णांची नोंद झाली आहे. महापालिका क्षेत्रांचा विचार करता मुंबईत मलेरियाचे तब्बल सहा हजार ३३९ रुग्ण (पान ४ वर)

## मुंढेंच्याविरोधात व्यापारी आक्रमक थेट न्यायालयात जाण्याचा इशारा

**नाशिक, दि. २३ : सुट्टे खाद्यतेल विक्रीवर बंदी घालण्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्णयाविरोधात राज्यातील व्यापारी आक्रमक झाले आहेत. या निर्णयावर चर्चा करण्यासाठी नाशिकमध्ये व्यापाऱ्यांची बैठक झाली. निर्णय मागे घेण्यासाठी सरकारला पंधरा दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला असून, तो मागे न घेतल्यास न्यायालयात धाव घेण्याचा तसेच राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे.**

अन्न आणि औषध प्रशासनाचे



आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुट्टे खाद्यतेल विक्री आणि खरेदी न करण्याचे आवाहन केले आहे. पॅकेज्ड तेल खरेदी करताना लेबल, सील आणि मुदत तपासण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. भेसळयुक्त किंवा नियमबाह्य खाद्य तेलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका प्रशासनाकडून मांडण्यात आली आहे. व्यापाऱ्यांचा निर्णयाला विरोध नाशिकमध्ये (पान ४ वर)

## सुविधा देणे शासनाचे कामच आहे त्यासाठी निमित्त शोधू नका!

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.वैराळेंचा शासनास सल्ला

**शिरपूर, दि.२३ (का.प्र.) : माझ्या गरजेच्या वेळी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास सर्वसामान्य नागरिकांत निर्माण करणारी व्यवस्था तयार झाली पाहिजे. विशिष्ट प्रसंगीच सुविधा देण्याचा विचार होतो ही बाब खेदजनक आहे. सुविधा देणे शासनाचे कामच आहे, त्यासाठी निमित्त शोधण्याची गरज नाही, असे मत नवी दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती प्रसन्ना वराळे यांनी येथे व्यक्त केले. येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात नवीन न्यायदान कक्ष, ग्रंथालय कक्ष व वकील संघाच्या कक्षाचे उद्घाटन आणि**



**नूतन नामफलकाचे अनावरण २२ ऑगस्टला न्यायमुर्ती वराळे यांच्याहस्ते करण्यात आले.**

यानिमित्ताने आर.सी.पटेल शैक्षणिक संकुलाच्या राजगोपाल भंडारी हॉलमध्ये झालेल्या समारंभात ते बोलत होते. मुंबई येथील उच्च न्यायालयाचे न्या. सारंग कोतवाल, न्या.नितीन सूर्यवंशी, न्या.संतोष चपळगावकर, न्या.शैलेश ब्रह्मे, जिल्ह्याचे पालक न्या.अजित कडेठाणकर, न्या. वैशाली पाटील-जाधव, न्या. आबासाहेब शिंदे, कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्या.समृद्धी भिष्म, शिरपूरचे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्या.एम. जी.चव्हाण, वरिष्ठ दिवाणी न्या. श्रीमती एल.पी.धन्वे, दिवाणी न्या.ढोरे, निवृत्त न्या.एस.जी.मेहरे, आमदार अमरीशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा, प्रांताधिकारी डॉ. शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी, अपर पोलिस अधीक्षक अजय देवरे, माजी उपमहाधिवक्ता राजेंद्र रघुवंशी, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य ॲड. ज्ञानेश्वर बागूल, औरंगाबाद खंडपीठाचे शासकीय अभियोक्ता ॲड.अमरजीत गिरासे, शिरपूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. शांताराम महाजन, उपाध्यक्ष ॲड. विजय पाटील, सचिव ॲड. निलेश चव्हाण, कोषाध्यक्ष ॲड. प्रवीणसिंह पाटील (पान ४ वर)

## शाळांचा आठवड्याला आढावा घ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आवाहन

**मुंबई, दि. २३ : राज्यातील शाळांचे आधुनिकीकरण करून शिक्षण व्यवस्थेत प्रत्यक्ष आणि गुणवत्तापूर्ण बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण विभागाने मिशन मोडवर काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुंबईतील नंदनवन बंगल्यावर शनिवारी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आणि शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या तब्बल चार तासांच्या बैठकीत त्यांनी शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतला. शिक्षण विभागाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती घेतल्यानंतर शिंदे यांनी सुरू असलेल्या चांगल्या कामाचे कौतुक केले. मात्र, या योजनांचा लाभ राज्यातील प्रत्येक शाळेतील आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी स्पष्ट, सर्वसमावेशक आणि कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.**

मुलांच्या आकांक्षा आणि स्वप्ने बदलत आहेत. त्यानुसार आपल्या शाळाही बदलल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला भविष्यातील संधी आणि आव्हानांसाठी तयार करणारी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि भविष्यवेधी शिक्षणव्यवस्था निर्माण केली (पान ४ वर)



## शहाद्यात दाऊदी बोहरा समाजाची ईद-ए-मिलादुन्नबी रॅली

**शहादा, दि.२३(का.प्र.)- ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त शहादा शहरातील दाऊदी बोहरा समाजाच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन अत्यंत उत्साहात करण्यात आले.**

बँड पथकाच्या गजरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून या रॅलीला सुरुवात झाली. पुढे विविध मार्गांवरून जात बोहरी कॉलनी परिसरात रॅलीचा यशस्वी समारोप झाला.या रॅलीमध्ये दाऊदी बोहरा समाजासह सर्वधर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेचा संदेश दिला. विविध समाजातील नागरिकांच्या उपस्थितीमुळे या रॅलीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.या प्रसंगी शहादा नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील, उपनगराध्यक्ष माधवीताई पाटील, उद्योजक नूहभाई नुरानी, नगरसेवक ज्ञानेश्वर चौधरी, नगरसेवक सागर मराठे, ॲड. राजेश कुलकर्णी, प्रा.आर. टी. पाटील, ड. जसराज संचेती, ज्येष्ठ पत्रकार लोटन धोबी, पत्रकार ईश्वर पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. ईद-ए-मिलादुन्नबीच्या या विशेष प्रसंगी धार्मिक उत्साहासोबतच शहरात सर्वधर्मीय ऐक्याचे दर्शन घडले. शांतता, प्रेम, बंधुभाव आणि परस्पर सन्मानाचा संदेश देत ही रॅली अत्यंत आनंददायी आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडली.

## शिरपुरात उद्यापासून स्वर मंजुषा व्याख्यानमाला शुभारंभ होणार

**शिरपूर (विशेष प्रतिनिधी)- कॅ. नारायण छगनलाल भंडारी यांच्या स्मृती, विचार आणि समाजहिताच्या मूल्यांना अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'स्वर मंजुषा' व्याख्यानमालेचे १५ वे पुष्प येत्या २५ ते २७ ऑगस्ट दरम्यान गुंफले जाणार आहे. गेल्या १५ वर्षांची परंपरा असलेला हा उपक्रम ज्ञानाची जागृती, विचारांतून परिवर्तन आणि संवादातून समाजप्रबोधन घडवण्याच्या उद्देशाने राबवला जात आहे.**

हा तीन दिवसीय व्याख्यानमाला सोहळा स्व. स्वा. सैनिक शंकर नाना मंगल कार्यालय, शकुंतला लॉन्सजवळ, करवंद नाका, शिरपूर येथे दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत रंगणार आहे. या व्याख्यानमालेत पहिल्या दिवशी, मंगळवार दि.२५ ऑगस्ट रोजी मा. श्रुती, मा. कल्पिता व मा. गीता उपासनी या 'शिवोहम' या विषयावर विचार मांडणार आहेत. दुसऱ्या दिवशी, बुधवार दि.२६ ऑगस्ट रोजी मा. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा गुगल एआय आणि गीता - भविष्य घडवणारे भारतीय ज्ञान या विषयावर पुष्प गुंफतील. व्याख्यानमालेच्या अंतिम दिवशी, गुरुवार दि.२७ ऑगस्ट रोजी मा. गीता उपासनी या विज्ञान आणि धर्म या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या वैचारिक पर्वणीचा लाभ शिरपूर व परिसरातील सर्व रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजक श्रीमती सरजुबाई भंडारी, राजेंद्र-सौ. विद्या भंडारी, योगेश-सौ. कविता भंडारी व अथर्व भंडारी यांनी केले आहे

## एसएसव्हीपीएसच्या विद्यार्थ्यांनी साकारली वंदे मातरमची भव्य मानवी प्रतिकृती साकार

**धुळे, दि.२४- भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्यसाधून श्री. शि. वि. प्र. संस्थचे कै. कर्म. डॉ. पां. रा. घोगरे कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, धुळे येथे विद्यार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलतेला देशभक्तीची जोड देत 'वंदे मातरम'ची भव्य व आकर्षक प्रतीकृती साकारली. विद्यार्थ्यांच्या सामूहिक सहभागातून साकारलेल्या या अभिनव उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.**

महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. टी. पाटील



यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन केले. स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि देशाविषयी अभिमानाची भावना जपण्याचा संकल्प केला. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ व्हावी आणि त्यांच्या कलागुणांना सर्जनशील व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने 'वंदे मातरम्'ची आकर्षक प्रतीकृती साकारण्यात आली. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला. प्रतीकृतीची रचना, नियोजन, साहित्याची मांडणी तसेच प्रत्यक्ष निर्मितीच्या प्रक्रियेत ५०० विद्यार्थ्यांनी एकजुटीने काम केले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपापली जबाबदारी उत्साहाने पार पाडत उपक्रम यशस्वी (पान ४ वर)

## सोनगीरजवळ ट्रक चालकाची हलगर्जी कंटेनर चालकाचा मृत्यू; गुन्हा दाखल

**सोनगीर दि. २३( प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा महामार्गावर सोनगीर येथील एन.जी.बागुल हायस्कूलसमोर उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून कंटेनरने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात कंटेनर चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (दि. २१ ऑगस्ट) सकाळी सुमारास घडली.गिरिराज रामजीलाल मीना (वय ५५, रा. सुराणा, ता. शहापुरा, जि. जयपूर, राजस्थान) असे मृत कंटेनर चालकाचे नाव आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मृत गिरिराज मीना हे बी. आर. डी. लॉजिस्टिक्स कंपनीचा अशोक लेलँड कंटेनर (क्र. ६६ ७२८०) घेऊन कोल्हापूरकडून जयपूरकडे जात होते. सोनगीर गावाजवळ महामार्गावर एन. जी. बागुल हायस्कूलसमोर समोर चाललेल्या एका ट्रकचे (क्र. ४१ ३५२१) टायर फुटल्याने तो रस्त्यावरील दुभाजकाला (डिव्हायडर) लागून उभा होता. मात्र, संबंधित ट्रक चालकाने वाहन धोकादायक स्थितीत उभे करताना कोणतेही इंडिकेटर किंवा सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती काळजी घेतली नव्हती.सकाळी ७ वाजेच्या सुमारास गिरिराज मीना यांचा कंटेनर या उभ्या ट्रकला पाठीमागून जाऊन आदळला. या अपघातात कंटेनरच्या पुढील भागाचा पार चुराडा झाला. यामध्ये गिरिराज मीना यांना दोन्ही पायांना व डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह सोनगीर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला.याप्रकरणी मृत चालकाचा मुलगा अजय कुमार मीना (वय २६) याने दिलेल्या फिर्यादीवरून सोनगीर पोलीस ठाण्यात ट्रक (क्र. ४१ ३५२१) चालकाच्या हलगर्जीपणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो. हे. कॉ. ईश्वर सोनवणे करीत आहेत.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,44,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,57,500 रु.+3% GST
चांदी- 2,43,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## पंचवीस ऑगस्टला डिनर डिप्लोमसीचे नियोजन महायुतीची मोठी खेळी : फडणवीसांचे मार्गदर्शन

**मुंबई, दि. २३ : राज्याच्या राजकारणात महायुतीच्या आगामी रणनीतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण, पंचवीस ऑगस्टला महायुतीच्या मंत्री, आमदार आणि प्रमुख नेत्यांचे स्नेहभोजन आयोजित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या डिनर डिप्लोमसीच्या माध्यमातून महायुतीतील अंतर्गत समन्वय अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती आहे.**

गेल्या काही महिन्यांत महायुतीतील तीनही घटक पक्षांच्या नेत्यांमध्ये विविध विकासकामांचे श्रेय, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि आगामी राजकीय समीकरणांवरून मतभेदाचे सूर उमटले होते. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर नेत्यांकडून एकमेकांवर उघड टीकाही करण्यात आली. या पार्श्वभूमीवर ऑगस्टच्या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महायुतीतील तिन्ही पक्षांच्या लोकप्रतिनिधींमध्ये अधिक समन्वय निर्माण व्हावा, विकास कामांसाठी एकत्रितपणे काम व्हावे आणि सार्वजनिक ठिकाणी होणारे मतभेद टाळावेत, यासाठी या स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

स्नेहभोजन सोबतच आगामी राजकीय आव्हानांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्री आणि आमदारांना मार्गदर्शन करण्याची शक्यता आहे. महायुती सरकारच्या कामकाजात समन्वय राखणे, अंतर्गत मतभेद टाळणे आणि आगामी आव्हानांना एकत्रितपणे सामोरे जाण्याबाबत बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. महायुतीतील अंतर्गत नाराजी आणि संभाव्य बंडखोरी रोखण्यासाठीही नेतृत्वाकडून लोकप्रतिनिधींना सूचना दिल्या जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे ही बैठक केवळ सकेहभोजनापुरती मर्यादित न राहता महायुतीच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे.

ऑल इज वेलचा संदेश

तिन्ही घटक पक्षांचे मंत्री, आमदार आणि प्रमुख नेते एकाच व्यासपीठावर एकत्र येणार असल्याने महायुतीत सर्व काही सुरळीत असल्याचा राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. अंतर्गत (पान ४ वर)

## कारने दिलेल्या धडकेत मोटार सायकलस्वार ठार

धुळे, दि. २३ : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील रेल्वे ब्रिजच्या चौफुलीवर भरधाव कारने दिलेल्या धडकेत मोटार सायकलस्वार मजुर गंभीर जखमी होऊन ठार झाला. आनंदा राजेंद्र कढरे (रा. वडजाई ता. जि. धुळे) असे त्यांचे नाव आहे. सेंट्रींग मजूर असलेला आनंदा कढरे हा मोटार सायकलने शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास गावाकडे जात होते. कार ही भरधाव वेगात जात असताना वडजाई-गरताड रस्ता चौफुलीवर कारने (पान ४ वर)

## मांजरोद-निम तापी पुलाच्या कामाची प्रतीक्षा कायम

**शिरपूर, दि.२३- शिरपूर तालुक्यातील मांजरोद व अमळनेर तालुक्यातील निम गावाला जोडणाऱ्या तापी नदीवरील पुलाची प्रतीक्षा अजून कायम आहे.**

शिरपूर तालुक्यातील मांजरोद व अमळनेर तालुक्यातील निम गावाला जोडणाऱ्या तापी नदीवरील पुलाच्या कामासाठी खासदार स्मिता वाघ तसेच अनेक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे मागणी केली आहे. या पुलासाठी रु. कोटींचा निधी मंजूर झाल्याची माहिती सोशल मीडिया व विविध माध्यमांतून प्रसारित होत असून, हे काम अजून केंद्र शासनाकडून मंजूर झालेले नाही. निम-मांजरोद तापी पुलाबाबत अनेक वर्षांपासून परिसरातील नागरिकांकडून मागणी केली जात आहे. शिरपूर तालुका आणि मध्य प्रदेशातील दळणवळण अधिक सुलभ व्हावे, तसेच निम, मांजरोद व परिसरातील गावांना वाहतुकीची सोय उपलब्ध व्हावी, यासाठी या पुलाचे महत्त्व मोठे आहे. मात्र, या पुलासाठी रु. कोटींचा निधी मंजूर झाल्याची माहिती चुकीची आहे.

दरम्यान, संबंधित पुलाबाबत निधी मंजुरी, प्रशासकीय मान्यता किंवा शासन निर्णय अद्याप झालेला नाही. निम-मांजरोद तापी पुलाच्या विकासकामाबाबत नागरिकांची सकारात्मक अपेक्षा असून नागरिकांच्या हिताचा आणि परिसराच्या विकासासाठी महत्त्वाचा असलेल्या या प्रकल्पाबाबत भविष्यात अधिकृत माहिती उपलब्ध झाल्यानंतरच त्याची योग्य ती माहिती प्रसिद्ध व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## रासायनिक खतांना पर्याय; ऊस लागवडी पूर्वी बामखेडा परिसरात हिरवळीच्या खतावर भर

**शहादा, दि.२३(प्रतिनिधी)- शेणखताच्या वाढलेल्या दरामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ होत आहे. त्यातच रासायनिक खतांच्या किमतीही वाढल्याने शेतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर शहादा तालुक्यातील बामखेडा येथील प्रगतिशील शेतकरी राकेश पाटील यांनी खर्च कमी करण्यासाठी तसेच जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी हिरवळीच्या खताचा प्रयोग**



**केला आहे. पूर्वहंगामी उसाची लागवड करण्यापूर्वी त्यांनी धैंचा ची पेरणी करून त्याची वाढ झाल्यानंतर रोटावेटरच्या साहाय्याने हे पीक जमिनीत गाडले. या प्रयोगातून नैसर्गिक पद्धतीने हिरवळीचे खत तयार करून जमिनीची सुपीकता वाढविण्याचा प्रयतक त्यांनी केला आहे.**

सध्या शेणखताच्या वाढलेल्या किमतीमुळे (पान ४ वर)

आपला महाराष्ट्र

# भरकटलेले शैक्षणिक धोरण आणि तरुणांचा टाहो

देशाचे शैक्षणिक धोरण गेल्या बारा–तेरा वर्षांपासून भरकटलेले आहे. विज्ञानवादी दृष्टीकोना ऐवजी धार्मिक प्रभाव असलेला इतिहास, स्वातंत्र्याच्या आंदोलनातील बदललेले आयाम, त्यासंबंधीचा खोटा इतिहास, एवढेच नव्हे तर शालेय अभ्यासक्रमात देव देवतांचा इतिहास असावा असे शासक पक्षाच्या मातृसंस्थेचे प्रमुख म्हणतात. याचा अर्थ वास्तवात कुठल्याही देवाचे अस्तित्व नसलेल्या इतिहासाचा अभ्यासक्रमात समावेश असे नव्या पिढीला भरकटत नेणारा अभ्यासक्रम पुढे येणार आहे. ज्यात विज्ञानवादी दृष्टिकोन अजिबात असणार नाही. त्यामुळे या शिक्षणाच्या व्यवस्थेत विवेकाला कुठेच थारा नसणार हे उघड आहे. इतिहासाचे पुनर्लेखन करण्यासाठी जी समिती नियुक्त करण्यात आली आहे त्यात उत्तर प्रदेशातील विशिष्ट वर्गाचे अभ्यासक आहेत म्हणजे त्या इतिहासाचे काय होणार आहे ते आपल्या चटकन लक्षात यावे. दुसरा मुद्दा असा की खाजगी क्लासेसचे एवढे पेव फुटलेले आहे की, अलीकडच्या काळात महाविद्यालये आणि खाजगी क्लासेसचे करार होतात. महाविद्यालयाच्या पटावर विद्यार्थी असणार आणि मोठ्या संख्येने ते विशिष्ट क्लासेस मध्ये प्रवेश घेणार. अशी एक व्यवस्था उदयाला आलेली आहे. त्यातून परीक्षेचे अथवा स्पर्धा परीक्षेचे पेपर फुटण्याची प्रक्रिया सुरू झाली. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर दलालांचा सुळसुळाट झाला. १५ ऑगस्ट च्या लाल किल्ल्यावरील भाषणात पंतप्रधानांनी या क्लासेसच्या बाजारावर भाष्य केले आहे. भविष्यात त्यासंबंधीचा सकारात्मक कोणता परिणाम दिसेल ते बघावयाचे आहे. या संदर्भात विचारवंतांनी, साहित्यिकांनी, अभ्यासकांनी तसेच राजकीय क्षेत्रातील मूखंडांनी चकार शब्द उच्चारला नाही. भले भले मूग गिळून होते. शेवटी ज्यांना परिस्थितीचे चटके बसतात त्या तरुणांनी या प्रश्नावर रस्त्यावर उतरण्याचे ठरविले आणि गेल्याच महिन्यात आपण जंतर–मंतर वरील त्यांचे आंदोलन बघितले. व्यवस्था परिवर्तनाच्या प्रक्रियेत तरुण आता मागे राहणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते.

सार्वजनिक भरती परीक्षा व्यवस्थेत आणि शिक्षणात पारदर्शकता तसेच उत्तरदायित्वाची मागणी करत देशभरातील विद्यार्थी–युवा आंदोलन खूप तीव्र झाले होते.प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षा रद्द होणे आणि नियुक्त्यांना होणारा विलंब यामुळे निर्माण झालेला असंतोष आता केवळ परीक्षा सुधारणेपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो तरुणांचे भविष्य, रोजगार आणि लोकशाहीतील उत्तरदायित्वाशी संबंधित राष्ट्रीय प्रश्न बनला आहे. विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी छात्रो की गुंज च्या माध्यमातून याच मुद्द्यावर विद्यार्थ्यांसोबत जुळले असून त्यांनी मोठी लढाई सुरू केली आहे. ती तीव्र बनत आहे. म्हणूनच तरुणांमध्ये निर्माण झालेला असंतोष आता व्यापक सामाजिक आणि राजकीय आंदोलनाचे रूप धारण करू लागल्याचे हळूहळू स्पष्ट होत आहे

भारतात ते वर्षे वयोगटातील सुमारे ४० कोटी तरुणांची लोकसंख्या आहे. ही देशाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास टक्के आहे. या व्यवस्थेशी हा तरुण वर्ग प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या जोडलेला आहे. वारंवार परीक्षा रद्द होणे, नियुक्त्यांना होणारा विलंब आणि राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या कार्यपद्धतीवर उपस्थित होणारे प्रश्न यामुळे लाखो तरुणांचे भविष्य अनिश्चित झाले आहे.रद्द झालेल्या प्रत्येक परीक्षेमागे आणि फुटलेल्या प्रत्येक प्रश्नपत्रिकेमागे अनेक वर्षांची मेहनत, कुटुंबांनी केलेली आर्थिक गुंतवणूक, मानसिक ताण आणि भंगलेली स्वप्ने दडलेली आहेत. त्यामुळे हे आंदोलन आता केवळ परीक्षा सुधारणेपुरते मर्यादित राहिलेले नाही. ते तरुणांना रोजगार, महागाई आणि भविष्याची सुरक्षितता अशा व्यापक प्रश्नांशीही जोडले गेले आहे.शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करून तो त्यांनी घेण्यास भाग पाडले. तसेच परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी मंत्रिमंडळातील प्रमुख मंत्र्यांच्या सोबत चर्चा करून केली.दिल्ली, मुंबई, पटना, बेंगळुरू यांसह अनेक शहरांमध्ये मेणबत्ती मार्च, धरणे आणि निदर्शने आयोजित केली गेली. झारखंड मध्ये दीर्घकाळ चाललेले आंदोलन नुकतेच स्थगित करण्यात आलेले आहे. तरुणांनी सरकारला शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेत सुधार करण्यासाठी दोन महिन्याचा अवधी दिलेला आहे. झारखंड म्हणजे पूर्वीचा बिहार होय. तिथूनच क्रांतीचा जन्म झालेला आहे. लोकनायक जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन सर्वांना आठवत असेल. त्या आंदोलनाने व्यवस्थेवर आघात करून ती बदलली हा इतिहास आहे. आताही तेथील तरुण थांबणार नाहीत असे दिसते. आंदोलनातील तरुणांना भोजनाची व्यवस्था स्वयंसेवी संघटनांनी केली हे विशेष म्हणावे लागेल .मोठ्या संख्येने सामान्य नागरिकांनी अन्न आणि इतर आवश्यक साहित्य पाठवून आंदोलनाप्रती आपली सहानुभूती व्यक्त केली .यामुळे आंदोलनाला सामाजिक संवेदनशीलतेचेही स्वरूप प्राप्त झाले . हेच चित्र आणीबाणी नंतरच्या निवडणुकीच्या काळात दिसले होते. आता अघोषित आणीबाणीविरुद्ध देखील तरुण एकजूट होतील अशी अपेक्षा आहे.

जुलै रोजी संसद मोर्चादरम्यान दिल्ली पोलीस आणि आंदोलक यांच्यात संघर्ष झाला. पोलिसांनी अश्रुधुराचा वापर, लाठीमार तसेच इतर प्रकारे बळाचा वापर केला. अनेक आंदोलक आणि पोलीस कर्मचारी जखमी झाले. आंदोलकांनी त्यांच्यावर अत्यधिक बळाचा वापर केल्याचा आरोप केला, तर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. परंतु विरोधी पक्षांनी संसदेत सरकार पक्षाला या प्रश्नावर सळो की पळो करून सोडले. गृहमंत्र्यांची ही जबाबदारी आहे यावर ते ठाम होते. आता राहुल गांधी यांनी गृहमंत्र्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पॅलेट गन चालविण्याचा आदेश गृहमंत्र्याचाच आहे किंवा त्यांच्या अधिपत्याखालील पोलिसांनीच तो केलेला आहे त्यामुळे जबाबदारी त्यांची आहे असे त्यांचे म्हणणे आहे. आंदोलन स्थळी जे अडथळे निर्माण करण्यात आले होते त्यात विद्युत प्रवाह सोडण्यात आला आणि ज्या लाठ्यांनी पोलिसांनी तरुणांवर प्रहार केले त्या लाठ्यांना खिळे ठोकलेले होते असाही आरोप आहे. या सर्व प्रकारांची चौकशीची मागणी तरुणांनी केलेली आहे. आगामी एक दोन महिन्यात तरुणांचा कॉकरोच नावाचा पक्ष शहरा शहरात फिरून लोकांचे प्रश्न समजून घेणार आहे. जागृत समाज व्यवस्थेचे ते एक चांगले लक्षण म्हणावे लागेल. सरकारने .राजधानीतील संवेदनशील जंतर–मंतरपासून संसद भवनापर्यंत आणि विशेषत: आसपासचा परिसर पूर्णपणे छावणीसारखा करण्यात आला होता.येथे मोठ्या संख्येने पोलीस दल तैनात करण्यात आले होते. जमिनीवरील सुरक्षा व्यवस्थेबरोबरच दिल्लीची सुरक्षा आधुनिक तंत्रज्ञानानेही सज्ज करण्यात आली होती. असे असतानाही दुसऱ्या दिवशी मोठ्या संख्येने विद्यार्थी आंदोलनस्थळी पोहोचले आणि संघर्ष सुरू ठेवण्याची घोषणा केली. अशा त–हेने तरुणांचा उत्साह कोणीही दबाव तंत्रातून दाबून ठेवू शकत नाही हे देखील या आंदोलनातून सिद्ध झालेले आहे.

कॉंग्रेस नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आंदोलकांच्या समर्थनार्थ निदर्शने केली आणि त्यांना अटक करण्यात आली. उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, शरद पवार, सुप्रिया सुळे, अरविंद केजरीवाल आणि संजय सिंह यांच्यासह अनेक नेत्यांनी जंतर–मंतरवर पोहोचून आंदोलनाला पाठिंबा दिला होता हे आपण सर्वच जाणतो. कारण सत्ताधारी पक्ष असो की विरोधी पक्ष असो कुणालाही तरुणांच्या इच्छा आकांक्षांच्या विरोधात जाता येणार नाही. हा त्यातील मतितार्थ म्हणावा लागेल.अनेक मानवाधिकार संघटनांनी शांततापूर्ण निदर्शनांदरम्यान झालेल्या बळाच्या वापराबाबत चिंता व्यक्त केली होती. लोकशाही अधिकारांचा आदर करण्याची गरज अधोरेखित केली. सरकारवर या संघटनांनी आक्षेप घेतला. मानवाधिकार संघटना आतापर्यंत काही बोलत नव्हत्या परंतु प्रथमच त्यांनी तोंड उघडले आणि या प्रश्नावर भाष्य केले ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणावी लागेल.भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आणि अहिंसक पद्धतीने आपले मत मांडण्याचा तसेच धरणे आणि निदर्शने करण्याचा अधिकार देते. आंदोलक विद्यार्थ्यांचे म्हणणे असे होते की, त्यांचा संघर्ष केवळ एखाद्या एका परीक्षा किंवा भरती प्रक्रियेपुरता मर्यादित नाही. संपूर्ण शिक्षण आणि भरती व्यवस्थेत पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्व प्रस्थापित (पान ३ वर)




## दहशतीसाठी फिरणाऱ्या तरुणास दोंडाईचात अटक

धुळे, दि. २३ : दोंडाईचा शहरातील कंजरवाडा परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या तरुणास पोलिसांनी अटक केली. विष्णु किसन वळवी (रा. म्हसल्या मारुती दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे) असे त्याचे नाव आहे. शनिवारी पहाटे दहशत निर्माण करण्याचा उद्देशाने तो जुना कंजरवाडया जवळ फिरताना आढळला. कारण, नसतांना चाकु, लोखंडी सळई बेकायदा स्वःत बाळगली. मोटारसायकल कोणाची आहे, याबाबत विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. हवालदार निलेश धनगर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार विष्णू वळवी यांच्या विरुद्ध दोंडाईचा पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल झाला आहे.

# तोरणमाळ मध्ये अस्वच्छतेच्या साम्राज्याने पर्यटक हैराण ठिकठिकाच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे ग्रामस्थ संतप्त



**धडगाव, दि.२३ (प्रतिनिधी)- स्वच्छ भारत, स्वच्छ शहरचा नारा देत शासनाकडून गाव आणि शहरांच्या स्वच्छतेवर मोठा भर दिला जात आहे. मात्र, महाराष्ट्रातील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेल्या तोरणमाळ येथे स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत आहे. गावातील तुंबलेल्या गटारी, रस्त्यावरून वाहणारे सांडपाणी आणि ठिकठिकाणी साचलेला कचरा यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**

तोरणमाळ गावातील अनेक भागांमध्ये गटारी गेल्या अनेक दिवसांपासून तुंबलेल्या आहेत. त्यामुळे दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावरून वाहत असून नागरिकांना त्यातूनच मार्ग काढावा लागत आहे. गटारीचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने स्थानिक नागरिकांसह तोरणमाळला येणाऱ्या पर्यटकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दैनंदिन साफसफाईअभावी अनेक भागांत आधीच अस्वच्छता आणि दुर्गंधीचे वातावरण असताना तुंबलेल्या गटारींच्या सांडपाण्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती वाढत असून साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच गावात घराघरातून कचरा संकलन करण्यासाठी घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिकांसमोर कचरा विल्हेवाटीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे काही नागरिकांकडून कचरा व प्लास्टिकच्या पिशव्या उघड्यावर टाकल्या जात आहेत. हा कचरा नाल्यांमध्ये साचल्याने नाल्या तुंबण्याचे प्रमाणही वाढले आहे. रस्त्यांच्या कडेला व चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा पडून राहतो. पावसामुळे हा कचरा भिजल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत आहे.

स्वच्छतेच्या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे अनेकदा तक्रारी केल्या असल्याचे सांगितले जाते. मात्र, समस्या कायम असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गावातील मूलभूत स्वच्छता व्यवस्था, गटारीचे नियमित साफसफाई आणि कचरा संकलनाची व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

तोरणमाळ हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण असून येथे वर्षभर पर्यटकांची मोठी वर्दळ असते. अशा पर्यटनस्थळावर मुख्य रस्त्यांवरच कचरा आणि सांडपाणी दिसत असल्याने पर्यटनस्थळाच्या प्रतिमेलाही धक्का बसण्याची शक्यता आहे. नंदुरबार जिल्हा प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन तोरणमाळमधील तुंबलेल्या गटारींची साफसफाई, कचरा संकलन आणि नियमित स्वच्छता व्यवस्था सुरू करावी. तसेच स्वच्छतेबाबत निष्काळजीपणा करणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जिवनदादा रावताळे, करमसिंग रहेमसिंग रावताळे, रवींद्र छगन चौधरी, भरत जहांग्या चौधरी व ग्रामस्थांनी केली आहे.

# कल्याणकारी योजनांची माहिती द्या लोणखेड्यात चित्रा वाघांचे आवाहन

**नंदुरबार, दि. २३ (प्रतिनिधी)- मंडळ व बूथ पातळीवर महिला कार्यकर्त्यांचे सक्षम संघटन उभे करणे, अधिकाधिकमहिलांनासंघटनेशी जोडणे, नव्या महिला नेतृत्वाला संधी देणे तसेच शासनाच्या विविध महिला कल्याणकारी योजना सर्वसामान्य महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन भाजपच्या महिला मर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी येथे केले.**

भाजपा महिला मोर्चाच्या संघटनात्मक बळकटीकरणाच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्राताई वाघ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली शहादा-लोणखेडा येथे संघटनात्मक बैठक उत्साहात पार पडली. यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ. समिधा नटावदकर यांच्या उपस्थितीत महिला मोर्चाच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या सूचना, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेतल्या. बैठकीस प्रदेश पदाधिकारी जयश्री अहिरराव, गीता गिल्डा, सुरेखा पाटील, शहादा नगरपालिका उपनगराध्यक्ष माधवी पाटील, जयश्री पाटील, सविता जयस्वाल, ड. उमा चौधरी, सरचिटणीस नेहा पाडवी, शीतल चौधरी, आशा पाडवी, नीला मेहता, सानू वळवी, डॉ. सपना अग्रवाल यांच्यासह मंडळ अध्यक्ष, महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. बैठकीचे सूत्रसंचालन पद्मा परदेशी यांनी केले, तर आभार माधवी पाटील यांनी मानले. महिला मोर्चाच्या संघटनात्मक विस्तारासाठी आणि आगामी कार्याची दिशा निश्चित करण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.



# लायन्स क्लब ऑफ शिरपूर गोल्डचा पदस्थापना सोहळा उत्साहात संपन्न

**शिरपूर, दि.२३- लायन्स क्लब ऑफ शिरपूर गोल्डच्या लायनिस्टिक वर्ष - साठी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदस्थापना सोहळा तसेच प्रेरणादायी व्याख्यानाचा कार्यक्रम रविवार, दि. ऑगस्ट रोजी एस. एम. पटेल ऑडिटोरियम, फार्मसी कॉलेज, करवंद नाका, शिरपूर येथे उत्साहात संपन्न झाला.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी सायंकाळी वाजता चलती रहे जिंदगी या विषयावर प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते एमजेएफ लायन द्वारकाजी जालन (पुणे) यांचे हास्य, व्यंग्य आणि सकारात्मकतेने भरलेले प्रेरणादायी व्याख्यान झाले. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज, अडचणींवर मात करण्यासाठी आत्मविश्वास व सकारात्मक विचारांचे महत्त्व याबाबत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विनोदी आणि प्रभावी शैलीतील व्याख्यानाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यानंतर सायंकाळी वाजता लायन्स क्लब ऑफ शिरपूर गोल्डच्या पदस्थापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. नवनिर्वाचित अध्यक्ष शोभित गुप्ता, सचिव अतुल भंडारी आणि कोषाध्यक्ष स्वप्निल अग्रवाल यांनी पदभार स्वीकारला. पदस्थापना अधिकारी व प्रमुख पाहुणे म्हणून एमजेएफ द्वारका जालन उपस्थित होते. कार्यक्रमाला पीएमजेएफ सुप्रिया कोटवाल (सेकंड व्हाईस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर), पीएमजेएफ हेमंत सोनार (रीजन चेअरपर्सन), जितेंद्र जैन (झोन चेअरपर्सन) आणि एमजेएफ नितीन बांग (डिस्ट्रिक्ट गव्हर्नर -) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लायन्स क्लब ऑफ शिरपूरच्या - कार्यकारिणीतील अध्यक्ष डॉ. आशिष अग्रवाल, सचिव प्रितम पाटील आणि कोषाध्यक्ष विजय भंडारी यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.लायन्स क्लब ऑफ शिरपूर गोल्डच्या - वर्षातील सदस्यांमध्ये योगेश भंडारी, गौरव अग्रवाल, अभिजित शाह, नवीन हासवानी, अंकित गुप्ता, निलेश गुप्ता, अंकित सराफ, नीरज भंडारी, अनुज दायमा, नितीन अग्रवाल, भरत पाटील, पियुष अग्रवाल, सीए श्रीकेश राठी, सीए अभय अग्रवाल, प्रशांत गोयल, सीए कुणाल अग्रवाल, प्रवीण भदाणे, सीए स्वप्निल राठी, राजेंद्र देवरे, चिराग पटेल, सचिन दायमा, डॉ. अमित गुजराथी, संदीप मुनोत, डॉ. गणेश पाटील, सौरभ अग्रवाल, डॉ. मनोज बारी, सुमित अग्रवाल, डॉ. तुषार अग्रवाल, विकी कुकरेजा आणि विनय भंडारी यांचा समावेश आहे.समाजसेवा, आरोग्य, शिक्षण आणि गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# आ. अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते शिरपूरात मुस्लिम विद्यार्थ्यांचा सेमिनार उत्साहात सपन्न





**शिरपूर, दि.२३- शिरपूर मुस्लिम एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मुस्लिम स्टुडंट्स की हौसला अफजाई व एज्युकेशनल सेमिनार तसेच बक्षीस वितरण समारंभ शनिवार, दि. ऑगस्ट रोजी सकाळी वाजता आर. सी. पटेल मेन बिल्डिंगमधील राजगोपाल भंडारी हॉल, शिरपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी दहावी बारावी सीईटी नीट पदवी पदवीधर गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देऊन आमदार अमरिशभाई पटेल व मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल होते. प्रमुख मान्यवर म्हणून आमदार काशिराम दादा पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणी चेअरमन भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, फिरोज मासूलदार, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल मार्गदर्शन करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षण हेच सर्वात मोठे सामर्थ्य आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी मिळविणे पुरेसे नाही, तर ज्ञानाबरोबर कौशल्य, आत्मविश्वास, शिस्त आणि चांगले संस्कार आत्मसात करणे गरजेचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने मोठे स्वप्न पाहावे आणि ते पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयतक करावेत. शिरपूरची ओळख शिक्षणाच्या क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. या परिसरातील प्रत्येक समाजातील विद्यार्थ्याला उत्तम शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयतक करणे आवश्यक आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्या विद्यार्थ्याचा गौरव नसून त्याच्या पालकांचा, शिक्षकांचा आणि संपूर्ण समाजाचा गौरव आहे. आर्थिक अडचणी किंवा कोणत्याही परिस्थितीमुळे विद्यार्थ्याचे शिक्षण थांबता कामा नये. गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक ते सहकार्य मिळावे, यासाठी मी प्रयतक्शील आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःवर विश्वास ठेवावा, अपयशाने खचून जाऊ नये आणि यश मिळेपर्यंत प्रयत्न सोडू नयेत. शिरपूर मुस्लिम एज्युकेशन ट्रस्टने विद्यार्थ्यांच्या हौसला अफजाईसाठी आयोजित केलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. भविष्यातही अशा शैक्षणिक आणि विद्यार्थी हिताच्या उपक्रमांना माझे सहकार्य राहील, असेही भाई म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. हारून शेख बशीर (प्रमुख सल्लागार इकरा एज्युकेशन सोसायटी, जळगाव) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षणाचे महत्त्व, उच्च शिक्षणाच्या संधी, बदलत्या काळातील आव्हाने आणि विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्याची गरज याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास देवेंद्र पाटील, उपनगराध्यक्ष सौ. संगीताताई देवरे, भाजपा जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, शिक्षण सभापती श्यामकांत ईशी, बांधकाम सभापती वासुदेव देवरे, नगरसेवक इरफान मिर्झा, रेहनाबी सलीम पटवे, उजमावी इरफान कुरेशी, आवेश शेख महेमूद, रज्जाक कुरेशी, जाकीर अहमद शेख नजीर, शकील शेख नबू, हमीदखाँ पठाण, भालेराव माळी, माजी शिक्षण मंडळ सभापती जाकीर शेख, जाकीर अली जेके, शिरपूर मुस्लिम एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष हाजी सै. जाकीर सै. नूर, कादर बागवान, युसूफ बेग, सलीम खाटीक, अल्ताफ मुजावर, सै. अशफाक कादर, मुबीन शेख हमीद पहलवान, खतीब शेख अजीज, लईक खाटीक, युसुफ बेग, मुबीन शेख इब्राहीम, अय्युब खाँ पठाण, राजू एजंट शेख, जाकीर खाटीक, नासीर खान काजी, डॉ. जिशान शकीलखान, रफीक तेली, वसीम पटवे (गुड्डू), इरफान कुरेशी, तौसीफ बेग, नईम अलाउद्दीन (नड्डू), डॉ. मुबीन शेख, डॉ. फारुक खान, माजिद खान, डॉ. सै. इफ्तेखार, बिलाल खाटीक, शबाना मॅडम आणि लियाकत मुजावर, डॉ. आरजू सै. शाहकस्त, रहिम शब्बीर, मजहर पठाण, बबलू शेख, जाकीर तेली, सलीम पटेल, जावीद अलाउद्दीन उपस्थित होते.

## शब्दकोडे क्रमांक : २४३८



**आडवे शब्द :** १.व्यापार,घराचे व्यवस्थापन पाहण्याची क्रिया ४. डॉ.प्रकाश आमटे यांनी जनसेवा कार्य केलेला प्रांत ८.चहा-इंग्रजीत ९.उन्हाळ्यात प्यायले जाणारे दह्याचे एक थंड आणि गोड पेय १०.खूप काम करून थकल्यावर घेतला जाणारा आराम १२.विवाह सोहळ्यात मिरवणारी नवरदेवाची आई १४.कानांना ऐकू येणारा ध्वनी किंवा साद १६.एखाद्या वस्तूचे उदाहरण किंवा दाखवण्यासाठी ठेवलेले मॉडेल १८.एकापाठोपाठ एक,अनुक्रमे लावलेली रचना २०.उन्हाळ्याच्या दिवसांत खाल्ला २२.सर्व,संपूर्ण किंवा जमिनीवर आकारला जाणारा कर २४ .पतीची दुसरी पत्नी २५.रक्ताला दिला जाणारा एक काव्यात्मक किंवा हिंदी शब्द २६.झाडाची सुकलेली पाने २७.'आम्ही' या अर्थी वापरला जाणारा हिंदी शब्द २८.स्वयंपाकात आणि मसाल्यात वापरली जाणारी एक सुगंधी सुकी कळी ३१.एखाद्या गोष्टीवर किंवा पदावर हक्क सांगणारा मुख्य व्यक्ती ३३.देशात खरेदी-विक्रीसाठी वापरले जाणारे अधिकृत पैसे ३५.लग्नात नवरी किंवा नवरदेवाच्या सोबत करा घेऊन राहणारी मुलगी ३७.तंटा ४०.रुची ४१.सत्त्व, खरेपणा किंवा नैतिक बळ ४३.राजा-महाराजांचे राहण्याचे मोठे आणि भव्य राजवाडा ४५.हिंदू संस्कृतीतील प्राचीन आणि अत्यंत पवित्र ग्रंथ ४६.युद्ध, लढाई किंवा मोठा संघर्ष ४७.पुणे जिल्ह्यातील एक प्रसिद्ध तालुका किंवा ठिकाण ४९. प्रियकर ५०.चौकातील मुख्य रस्ता किंवा तपासणीचे ठिकाण ५१.कस्तुरी मृगाच्या बेंबीत आढळणारा अत्यंत सुगंधी आणि दुर्मिळ पदार्थ ५२.नाटकातील भूमिका ५३.डोंगरातून उगम पावून समुद्राला मिळणारा पाण्याचा मोठा प्रवाह ५४.रक्त-ग्रामीण बोलीत

**उभे शब्द :** १.काळाचे सतत फिरणारे चक्र किंवा बदलणारा वेळ २.वस्तू बांधण्यासाठी वापरली जाणारी जाड दोरी ३.ऐतवार ४.दुसऱ्याची प्रगती पाहून मनात निर्माण होणारा मत्सर किंवा असूया ५.जलद गतीने, ताबडतोब किंवा त्वरित ६.हात ७.वस्तू,जिन्नस आदी गोतावळा ११.शृंगार १३.भारतातील एक प्रमुख आणि पवित्र मानली जाणारी नदी १४.दिवंगत अभिनेते राज कपूर यांचा एक अजरामर सिनेमा १५.एकाच उंचीवर असलेला १७.उदास १९.जेवण रुचकर बनवण्यासाठी वापरतात २०.बनाव २१.अतूट २४.ग्रामीण बोलीत-सर्व २६.पापी २७.मोठा राजवाडा २९.नमन ३०.हिंदीत-हालचाल ३१.मेजवाणी ३२.क्रिकेटमधील धाव ३४.नूतन ३६.सैन्याचे अन्नधान्य ३८.चिलट ३९.भगवान शंकराचे वाद्य ४२.वेगात असलेला ४४.आक्षेप ४५.लहान आकाराचा बांबू ४६.महाराष्ट्र भूमीची खरी ओळख ४७.सावज ४८.लोखंडची परीक्षा पाहणारा दगड ४९.सखा

### शब्दकोडे क्रमांक : २४३७ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चि | ख | ल | | वि | दे | शी | | खा | र | | पे |
| व | डा | | ज्ञा | त | | त | पा | स | | आ | टा |
| डा | | पो | | र | स्ता | | ठ | | अं | गा | रा |
| | च | प | रा | क | | मा | | म | दा | र | |
| पा | | ट | न | | चि | ल | ट | | ज | | ध |
| क | ट | | टी | प | | क | र | म | | ता | ड |
| | क | ल | | हा | व | | फ | त | वा | | क |
| आ | म | | चु | रा | | ते | ल | | त | व | |
| | क | मा | ल | | मे | रा | | म | हा | न | ता |
| स | | म | त | दा | न | | वि | न | र | | प |
| ह | म | ला | | ख | | मौ | का | | क | रं | ट |
| ज | म | | मु | ला | मा | | र | ती | | ग | |

**पान १ वरुन**

## उच्च न्यायालयाचा निर्णय

अधिकार क्षेत्रातील जमीनधारकांनाही तिचा लाभ लागू होऊ शकतो, असे स्पष्ट केले आहे. बदलापूर औद्योगिक क्षेत्रातील जमीन १९६९ मध्ये एमआयडीसी ने संपादित केली होती आणि त्यानंतर औद्योगिक भूखंड ९५ वर्षांच्या लीजवर देण्यात आले. मात्र, संबंधित महानगरपालिकेकडून १९९९ पासून मालमत्ता कर आकारण्यात येत होता. त्यामुळे औद्योगिक उद्योजकांवर मोठ्या प्रमाणात कराची थकबाकी वसुलीची मागणी करण्यात आली होती. या निर्णयामुळे राज्यातील एमआयडीसी औद्योगिक वसाहतीतील हजारो उद्योग व भूखंडधारकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी मालमत्ता कराच्या मोठ्या मागण्या करण्यात आल्याने उद्योगांवर आर्थिक भार वाढला होता. मालमत्ता कर आकारणीबद्दल देखील स्पष्टता तसेच एकसमानता नसल्याने समान क्षेत्र असणाऱ्या उद्योगांना देखील कमी-अधिक करआकारणी होत होती. याबाबत पूर्णत: गोंधळाची स्थिती असल्याने काही उद्योगांना थकबाकी न भरल्यामुळे कारवाईलाही सामोरे जावे लागले होते. या महत्त्वपूर्ण निर्णयाचे औद्योगिक क्षेत्रातून स्वागत करण्यात येत असून, एम आयडीसीच्या औद्योगिक वसाहतींमध्ये सेवा शुल्क वसूल करूनही त्याच सुविधांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मालमत्ता कर आकारला जाण्याच्या दुहेरी भाराला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगांच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून, राज्यातील विविध औद्योगिक वसाहतींमधील प्रलंबित मालमत्ता कराच्या मागण्यांबाबतही याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो. सदरील निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करत विविध औद्योगिक संघटनांनी स्वागत केले आहे.

## गणपती मुर्ती कोसळली, दोन ठार

बृजेश हेमंत जोशी (वय ३०) यांचा मृत्यू झाला. संकेत नेवशे यांना एच. एन. रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित करण्यात आले. तर बृजेश जोशी यांना जी. टी. रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. भायखळ्यातील अनिकेत देसाई यांच्या कार्यशाळेतून शनिवारी संध्याकाळी वाजतगाजत गणेशमूर्ती भुलेश्वरमधील मंडपाकडे नेण्यात येत होती. मंडपाजवळ पोहोचण्यापूर्वीच ही दुर्घटना घडली. मंडळाचे यंदाचे हे ६३ वे वर्ष आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली असून, दुर्घटनेच्या कारणांचा तपास सुरू आहे. गणेशोत्सवाच्या उत्साहात घडलेल्या या दुर्घटनेमुळे मुंबईत हळहळ व्यक्त होत आहे.

## बारा हजारांपेक्षा अधिक रुग्ण

आढळले आहेत. यापैकी एक हजार २०० रुग्ण पी.एफ. प्रकारातील आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात ५०२, पनवेलमध्ये ३९४, तर मीरा-भाईंदरमध्ये शंभर रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूमध्येही मुंबई सर्वाधिक

डेंग्यूच्या रुग्णसंख्येतही मुंबईचा आकडा सर्वाधिक आहे. मुंबई महापालिका क्षेत्रात एक हजार ८१० डेंग्यू रुग्णांची नोंद झाली आहे. पुणे महापालिका क्षेत्रात एक हजार १४०, तर ठाणे महापालिका क्षेत्रात ४५० रुग्ण आढळले आहेत. जिल्ह्यांमध्ये पालघरमध्ये २४०, पुण्यात १९३, धुळ्यात १४८ आणि लातूरमध्ये १२६ डेंग्यू रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे मुंबईसह पालघर आणि पुणे या भागांवर आरोग्य विभागाचे विशेष लक्ष आहे. चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येत पालघर जिल्हा २४० रुग्णांसह आघाडीवर आहे. पुणे जिल्ह्यात १३८, लातूरमध्ये ५६ आणि धुळ्यात ५५ रुग्ण आढळले आहेत. महापालिका क्षेत्रात पुण्यात ७१, मुंबईत ६१, अकोल्यात ४३ आणि कोल्हापुरात ३४ रुग्णांची नोंद झाली आहे. पावसाळा सुरू असल्याने डासांच्या उत्पत्तीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. मुंबईत मलेरिया आणि डेंग्यूचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत असल्याने शहर कीटकजन्य आजारांचे प्रमुख हॉटस्पॉट ठरत आहे. डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करणे, परिसरात स्वच्छता राखणे आणि तापाच्या रुग्णांची वेळेत तपासणी करणे आवश्यक आहे. पावसाळा आणखी काही काळ कायम राहणार असल्याने वेळीच प्रतिबंधात्मक उपाय न केल्यास रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता आहे.

## मुंढेंच्याविरोधात व्यापारी आक्रमक

झालेल्या बैठकीत राज्यभरातील व्यापाऱ्यांनी सुट्टे खाद्यतेल विक्रीबाबतच्या निर्णयाला विरोध दर्शविला. हा निर्णय मागे न घेतल्यास व्यापारी रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला. आवश्यकता भासल्यास न्यायालयात या निर्णयाला आव्हान देण्याबरोबरच केंद्र सरकारकडेही पाठपुरावा केला जाईल, असे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले. कठोर दंड आणि कारावासाच्या तरतुदींवरही व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. खाद्यतेल व्यवसाय करणाऱ्यांवर अशा प्रकारची कारवाईची तरतूद अन्यायकारक असल्याचा दावा करत, आम्ही अतिरेकी आहोत का? असा संतप्त सवाल व्यापाऱ्यांनी उपस्थित केला.

नियमभंग केल्यास कठोर कारवाई

दरम्यान, खाद्यतेलाच्या वापरासंदर्भातील नियमांचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाईची तरतूद असल्याचे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. भेसळ केल्यास तसेच दिशाभूल करणाऱ्या जाहिराती केल्यास मोठ्या दंडाची तरतूद असल्याचे त्यांनी सांगितले. काही गंभीर प्रकरणांत सात वर्षांपासून आजन्म कारावासापर्यंतच्या शिक्षेची तरतूद असल्याचेही त्यांनी नमूद केले. सुटे खाद्यतेल खरेदी न करता पॅकेज्ड तेल वापरावे, पॅकेटवरील लेबल आणि सील तपासावे तसेच उत्पादनाची मुदत आणि एक्सपायरी डेट पाहावी, असे आवाहन मुंढे यांनी केले आहे. तळण्यासाठी वापरलेले तेल वारंवार वापरणे टाळावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

आरोग्याचा मुद्दा केंद्रस्थानी

भेसळयुक्त आणि अयोग्य पद्धतीने वापरल्या जाणाऱ्या खाद्यतेलाचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. हा विषय केवळ ग्राहकांची फसवणूक रोखण्यापुरता मर्यादित नसून सार्वजनिक आरोग्याशी संबंधित असल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, व्यापाऱ्यांनी दिलेल्या पंधरा दिवसांच्या अल्टिमेटमनंतर सरकार काय भूमिका घेते आणि सुट्टे खाद्यतेल विक्रीबाबतचा निर्णय कायम राहतो की त्यात बदल केला जातो, याकडे राज्यातील व्यापारी आणि ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

## सुविधा देणे शासनाचे कामच आहे

आदि उपस्थित होते. न्यायमुर्ती वराळे म्हणाले की, जनतेच्या न्यायविषयक अपेक्षा लक्षात घेऊन न्यायदान प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि सहज व्हावी यासाठी न्यायपालिका निर्णय घेत आहे. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयांची उपलब्धता हा त्यापैकीच एक निर्णय आहे. या न्यायालयांमुळे न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या जनतेचा वेळ आणि पैसा यात बचत होईल. न्यायमुर्ती सारंग कोतवाल, न्या. सूर्यवंशी, ॲड.बागूल यांनी मनोगतातून शिरपूर न्यायालयाच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शिरपूर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. शांताराम महाजन यांनी प्रास्तविकातून शिरपूर न्यायालयाचा इतिहास, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या निर्मितीची पार्श्वभूमी सांगितली. न्या.परवेझ, प्रा. माधव कदम, ॲड. निखिल सोनवणे यांनी सूत्रसंचलन केले. न्या. एम. जी. चव्हाण यांनी आभार मानले. शिरपूर वकील संघातर्फे प्रकाशित न्यायकस्तुरी स्मरणिका तसेच न्या. वराळे यांचे वडील भालचंद्र वराळे यांच्या कारकिर्दीचा आढावा घेणाऱ्या पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले. शिरपूर वकील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संयोजन केले.

## डिनर डिप्लोमसीचे नियोजन

मतभेदांच्या चर्चांना पूर्णविराम देत आगामी काळात एकजुटीने काम करण्याचा संदेश देण्यासाठी पंचवीस ऑगस्टचे स्नेहभोजन महत्त्वाचे ठरणार आहे. महायुतीतील समन्वय, विकासकामांचे श्रेय आणि आगामी राजकीय रणनीती या मुद्द्यांवर या बैठकीत काय निर्णय होतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**पान १ वरुन**

## रासायनिक खतांना पर्याय

मोठ्या क्षेत्रावर शेणखत टाकणे अनेक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे काही शेतकरी शेणखताला पर्याय म्हणून रासायनिक खतांचा वापर वाढवत आहेत. मात्र, रासायनिक खतांच्या वाढत्या किमतीमुळे उत्पादन खर्चावर अतिरिक्त भार पडत आहे. अशा परिस्थितीत हिरवळीचे खत हा कमी खर्चातील पर्याय ठरू शकतो, हे पाटील यांच्या प्रयोगातून दिसून येत आहे. पूर्वहंगामी उसाची लागवड करण्यापूर्वी जमिनीमध्ये सेंद्रिय घटकांचे प्रमाण वाढावे, या उद्देशाने राकेश एकनाथ पाटील यांनी धैंचाची पेरणी केली. हे पीक उंच वाढल्यानंतर त्यावर रोटावेटर चालवून संपूर्ण हिरवळ जमिनीत मिसळून गाडण्यात आली. त्यामुळे पिकाचे अवशेष जमिनीत कुजून सेंद्रिय पदार्थात रूपांतरित होण्यास मदत होणार आहे. त्यानंतर उसाची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

हिरवळीचे पीक जमिनीत गाडल्यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढण्यास, मातीची रचना सुधारण्यास आणि ओलावा धरून ठेवण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पुढील पिकासाठी जमिनीची सुपीकता सुधारण्यास हातभार लागेल, असा पाटील यांचा विश्वास आहे.

सध्या शेतीमध्ये उत्पादन वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला जातो. मात्र, वाढता खत खर्च, मजुरी आणि इतर निविष्ठांच्या किमती यामुळे शेतकऱ्यांसमोर उत्पादन खर्चाचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून शेतीचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न राकेश पाटील यांनी केला आहे. रासायनिक खतांवर पूर्णपणे अवलंबून न राहता हिरवळीचे खत, सेंद्रिय घटक आणि जमिनीची नैसर्गिक सुपीकता यावर भर देण्याची गरज असल्याचे पाटील सांगतात. त्यांच्या या प्रयोगामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांनाही कमी खर्चात जमिनीची सुपीकता वाढविण्याच्या पद्धतींचा विचार करण्यास प्रोत्साहन मिळणार आहे.

**पान १ वरुन**

## वंदे मातरमची भव्य मानवी प्रतिकृती

करण्यासाठी योगदान दिले. या सामूहिक प्रयत्नातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, कल्पकता, संघभावना आणि नियोजनकौशल्य यांचे दर्शन घडले. या अभिनव उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला योग्य व्यासपीठ मिळावे, तसेच राष्ट्रीय सणांच्या माध्यमातून त्यांच्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ व्हावी, यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. आर. के. पाटील यांनीही उपक्रमाच्या नियोजनासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी हा उपक्रम शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहपूर्ण वातावरणात पूर्ण केला.

मवंदे मातरमफ्ची प्रतीकृती साकारण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांना मोलाचे सहकार्य केले. वंदे मातरम्फ हे केवळ दोन शब्द नसून त्यामागे मातृभूमीविषयी असलेला आदर, स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा आणि राष्ट्रप्रेमाची भावना दडलेली आहे. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या या प्रतीकृतीच्या माध्यमातून हाच संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी साकारलेली मवंदे मातरम्फ्ची ही आकर्षक प्रतीकृती महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरली. सर्व शिक्षकवृंदाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी साकारलेल्या या उपक्रमातून देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि सामूहिक प्रयत्नांचा सुंदर संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या सर्जनशील उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

## मोटार सायकलस्वार ठार

मोटरसायकलला जोरदार धडक दिली. त्यात गंभीर जखमी होऊन आनंदा कढरे यांचा मृत्यू झाला. दोन्ही वाहनाचे नुकसान झाले. जितेंद्र जिभाऊ गांगुर्डे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कार चालक वैभव हिराजी सोनवणे (रा. क्रांती चौक, चित्तोड रोड धुळे) याच्या विरुद्ध मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक प्रभाकर सोनवणे तपास करीत आहेत.

**पान १ वरुन**

## शाळांचा आठवड्याला आढावा घ्या

पाहिजे, असे शिंदे यांनी सांगितले. कृती आराखडा तयार करताना शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांना सहभागी करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षकांसाठी प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यासोबतच उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांचा योग्य सन्मान करण्यावरही भर देण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या शिक्षणविषयक योजनांची राज्यात प्रभावी आणि गतिमान अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले. विद्यार्थ्यांचा विकास केंद्रस्थानी

शिक्षण केवळ अभ्यासक्रम आणि परीक्षांपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकास केंद्रस्थानी असावा, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, पोषण, मध्यान्ह भोजन योजना तसेच मानसिक आरोग्य आणि भावनिक स्वास्थ्याशी संबंधित उपक्रमांना अधिक महत्त्व देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पालक आणि समाजाचा सहभाग शाळांच्या विकासात पालक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक समाजाची सक्रिय भागीदारी वाढविण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. शिक्षण विभागाच्या चांगल्या उपक्रमांची आणि त्यातून होणाऱ्या सकारात्मक बदलांची माहिती जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे निर्देशही शिंदे यांनी दिले.

आपल्या मतदारसंघातील शाळांच्या विकासासाठी आमदार आणि खासदारांनी शाळा दत्तक घ्याव्यात, असे आवाहन करण्यात येणार आहे. उपलब्ध निधी आणि स्थानिक संसाधनांच्या माध्यमातून शाळांच्या विकासात लोकप्रतिनिधींनी योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. शाळांच्या आधुनिकीकरणासाठी उद्योग आणि कॉर्पोरेट क्षेत्राची व्यावसायिक क्षमता वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तंत्रज्ञान, प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि आवश्यक संसाधनांसाठी उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींसोबत बैठका घेऊन सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी दर आठवड्याला प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे. कामातील अडचणी दूर करून शैक्षणिक सुधारणांना गती देण्यासाठी या आढावा बैठकीत आवश्यक निर्णय घेतले जातील, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

## ॲल्युमिनियम तार लंपास

धुळे, दि. २३ : जुन्नेर ते हेंकळवाडी (ता.धुळे) शिवारातून विजेची ॲल्युमिनियमची तीन लाख रुपयांची तार चोरुन नेली. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. चोरट्यांनी ॲल्युमिनीयम तारेचे दोन बंडल प्रत्येकी बंडल मध्ये सहा हजार मीटर तार १९ ऑगस्टला सायंकाळी सहानंतर चोरून नेली. ठेकेदार नरहरी दत्तात्रय अहिराव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला.


**शेती विक्री**

भाडणे शिवार,
स. नं. ५४४/१,
साक्री - पिंपळनेर रोड,
नागाईकडे जाणारा
रस्ता कॉर्नर येथील
९१ आर
शेत विकणे आहे.
इच्छुकांनी संपर्क
साधावा.
-: संपर्क :-
मो. 9850195001
9823189430






**शेती विकणे आहे**

मौजे धुळे ता.जि. धुळे येथील स. नं. ५३१/क भोगवट वर्ग -१ क्षेत्र ० हे. २२ आर. ही मिळकत **मदरसा सिराजुल उलुम** धुळेची आहे.
सदर शेती विकणे आहे.
-: माहितीसाठी संपर्क :-
हाजी इफतेखार अहमद मुन्ना शेठ 8625029286
बिलाल अहमद अन्सारी 9420440008

**प्लॉट विकणे आहे**

चार लाखात शहाद्यात प्लॉट :-
शहादा-सावळदे शिवारात धुळे रोड पासून १०० मिटर अंतरावरील रेसीडेंशीयल ४०० रु. प्रती स्क्वे. फुटाने १०००-१२०० स्क्वे. फुटाचे प्लॉटस विकणे आहेत.
-:संपर्क :- 8055401841

**पाहिजेत**

१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) एक्स-रे टेक्नीशियन
पाटील डायग्नोस्टीक सेंटर
वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे
(02562) 299500
Whatsapp- 9098444407

**प्लॉट विकणे आहे**

रामचंद्र नगर कॉंक्रीट रोडटच प्लॉट विकणे आहे. कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगरमध्ये ६० फुटी कॉंक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**

अग्रवाल नगरमध्ये २००० स्क्वेअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693.

**३ बीएचके बंगला भाड्याने देणे**

मालेगांव रोड लगत, महावीर सोसायटी जवळ, तीन बेडरूम, हॉल, डायनिंग, किचन, स्टोअर रूम फर्निचरसह गार्डन कंपाऊंड पार्किंग सह बंगला भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693






**भाड्याने देणे आहे**

दुकान भाड्याने देणे आहे.
स्थळ :-
पंचवटी आग्रारोड, देवपूर, धुळे
-:संपर्क :-
(चित्रा बिर्ला)
9309445441
8329366624

**पाहिजेत**

किड्स वेअर कपडे की दुकान के लिए
२ - सेल्समन
२ - हेल्पर
चाहिये
-:संपर्क :-
9767544005

**घर भाड्याने देणे**

सर्व सोयींयुक्त तीन रूम भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-
६९ शिवप्रताप कॉलनी, नकाने रोड देवपूर, धुळे.
9422792512
777585524

**पाहिजेत**

कापड दुकानासाठी खालील जागा भरणे आहेत.
सेल्समन- २
हेल्पर- २
-: समक्ष भेटा :-
सकाळी १० ते रात्री ९.०० पर्यंत.
बेबीज वर्ल्ड
नानक हार्डवेयर जवळ, धुळे.
9850835999

**अजळकरनगर रो हाऊस विकणे**

सुरत बायपास जवळ अजळकर नगरमध्ये दोन मजली रोहाऊस घर फर्निचरसह विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**

3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०